



व्ही. टी. पाटील सभागृहात 'लोकमत बाल विकास मंच'तर्फे बुधवारी आयोजित 'हा खेळ बाहुल्यांचा पपेट शो' या बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मुलांशी संवाद साधताना चैताली माजगावकर. दुसऱ्या छायाचित्रात शो पाहण्यासाठी बालमंच सदस्यांसह पालकांनी केलेली गर्दी.

## 'लोकमत बाल विकास मंच'तर्फे आयोजन : सुरेंद्र माजगावकर यांनी गोष्टींद्वारे घडविली गावाकडील सैर

# बोलक्या बाहुल्यांनी खळखळून हसविले

**कोल्हापूर :** सिंह, हत्ती या वन्य प्राण्यांसह पशुपक्ष्यांच्या आवाजांसोबत बोलक्या बाहुल्यांनी तब्बल दीड तास बालकांसह पालकांना मनसोक्त पोट धरून हसविले. निमित्त होते, 'लोकमत बाल विकास मंच'तर्फे आयोजित 'हा खेळ बाहुल्यांचा - पपेट शो'चे. 'गंमत-जंमत'ची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाचे सादरीकरण चैताली माजगावकर व त्यांचे वडील सुरेंद्र माजगावकर यांनी केले.

राजारामपुरीतील डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात बुधवारी सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी चाटे शिक्षण समूहाचे विभागीय संचालक प्रा. भारत खराटे, फन स्कूलचे प्राचार्य उमा पाटील, डॉट अँड टॉटस्च्या पीआरओ शिल्पा गोडी, खटावकर फौंडेशनचे अध्यक्ष सुयोग खटावकर, उपाध्यक्ष स्वप्निल पार्टे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभीच सभागृहात 'शेरखान'ने प्रेक्षकांमधून जबरदस्त एंट्री करताच उपस्थित मुलांनी एकच जल्लोष केला. यावेळी त्याची छबी मोबाईलमध्ये उतरविण्याचा मोह अनेक पालकांना आवरता आला नाही. शेरखानने मुलांच्या हातामध्ये हात देत सभागृहात फेरफटका मारला. त्याला पाहून मुलांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यानंतर 'देवा श्रीगणेशा' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

एक छोटा उंदीर जंगलच्या राजाची कशी मदत करतो, हे बाहुल्यांच्या माध्यमातून दाखवून कोणीही लहान-मोठे नसते, असा संदेश मुलांना देण्यात आला. आपण नेहमी टीव्हीवर असे बाहुल्यांचे शो पाहतो; मात्र आज प्रत्यक्षात हा कार्यक्रम पाहत आहोत, याचा आनंद क्षणोक्षणी मुलांच्या चेहऱ्यावर जाणवत होता. या बाहुल्यांच्या माध्यमातून साकारलेल्या या कथेनंतर तर 'ओ राधा तेरी चुनरी' या गीतावर दोरीवरच्या बाहुल्यांनी सभागृहात एकच जल्लोष केला. यावेळी त्यांनी मुलांना मनसोक्त नाचण्यास भाग पाडले. नृत्यानंतर उपस्थित मुलांना स्टेजवर बोलावून बाहुला-बाहुलीचा लग्नसोहळा पार पाडण्यात आला. या मुलांसह पालकांनी लग्नसोहळ्याचा आनंद घेतला. लग्नसोहळ्यानंतर 'लुंगी डान्स' या गाण्याचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाची रंगत वाढत असतानाच सुरेंद्र माजगावकर यांनी मित्रांच्या गावाकडील गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांनी टांगा, कुत्रा, कोंबडा, पोपट, मांजर, कावळा, कोकिळा अशा पशुपक्ष्यांसोबत रेल्वेगाडीचा हुबेहूब आवाज काढून अचंबित केले. यानंतर बोलणाऱ्या बाहुल्याने मुलांशी मनसोक्त गप्पा मारून त्यांना पोट धरून हसण्यास भाग पाडले. 'सुनो गौर से दुनियावालों' या गाण्याने या कार्यक्रमाची सांगता झाली. दरम्यान, याशिका जैन या मुलीने 'स्वच्छता' या विषयावर मनोगत व्यक्त केले. 'लोकमत बाल विकास मंच'चा हा पहिलाच कार्यक्रम असल्याने सभागृह तुडुंब भरले होते.

### अजूनही नोंदणीची संधी...

'लोकमत बाल विकास मंच'ची नोंदणी अजूनही सुरु असल्याने सदस्य होण्याची अजूनही संधी आहे. सदस्यता नोंदणी व अधिक माहितीसाठी लोकमत बाल विकास मंच, लोकमत कार्यालय, कोंडा ओळ, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर; मोबाईल क्र. नितीन : ७७९८३४४७४४, गीता जरग, प्लॉट नं. ६०, चावरेकर कॉलनी, तुळजाभवानी मंदिराजवळ, सानेगुरुजी वसाहत मो. ८२३७८६९६२७, दीप्ती सासने, महालक्ष्मी कॉलनी, प्राची हॉटेलसमोर, आपटेनगर मो. ९३७२८३१०८०, स्मिता ओतारी, गौतम अपार्टमेंट, राजारामपुरी तेरावी गल्ली, मो. ९६५७३१४५५३, सुजाता अढाव, न्यू पॅलेस, मुंगावकर मळा मो. ९६८९४७४३४६ , इचलकरंजी : लोकमत कार्यालय, हवामहल बंगला, वारणा बँकेजवळ, राजाराम रोड, इचलकरंजी, प्रियांका ८६००३७२२०१ येथे संपर्क साधावा.

### सामाजिक बांधीलकी

बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून फक्त मनोरंजन न करता चैत्राली यांनी 'बंडू' या काल्पनिक पात्राद्वारे मुलांना स्वच्छतेचा संदेश दिला. यासह गुड स्टेज व बॅड स्टेज या बाहुल्यांच्या माध्यमातून साकारलेल्या गोष्टींतून बाललैंगिक शोषणासारखी गंभीर समस्याही मांडली. बाललैंगिकसारख्या नाजूक समस्यांबाबत लहान मुलांनी कसे जागरुक राहावे, याची माहिती त्यांनी यावेळी दिली.